# अमराठी व्यक्तींना पुणे विद्यापीठ देणार मराठीचे धडे!

पुणे, ३० डिसेंबर/खास प्रतिनिधी

हीरकमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने पुणे विद्यापीठातर्फे मराठी भाषा संवर्धन केंद्र सुरू करण्यात येणार असून त्याद्वारे अमराठी व्यक्तींना मराठीचे धडे देण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मराठी नागरिकांची भाषाही सुधारण्यासाठी विशेष वर्ग चालविले जातील.

पुणे विद्यापीठाची १९४९ साली स्थापना करण्यात आली. पुण्याजवळच मुंबईसारखे प्रख्यात विद्यापीठ असताना आणखी एका विद्यापीठाची स्थापना करण्याची गरजच काय, असा सवाल विचारण्यात आला होता. त्यावर पहिले कुलगुरू बॅ. एम. आर. जयकर यांनी स्पष्टीकरण दिले होते. 'मराठीचा प्रचार-प्रसार करणे हे पुणे विद्यापीठाचे प्रमुख ध्येय आहे,' असे ते म्हणाले होते. परंतु, गेल्या सहा दशकांच्या कालावधीमध्ये त्या दिशेने फारसे प्रयत्न झाले नाहीत. लौकिकार्थाने मराठी विषयाचा स्वतंत्र विभाग विद्यापीठात कार्यरत आहे. परंतु, त्यामध्ये साहित्य-समीक्षा एवढ्यापुरताच अभ्यास मर्यादित राहतो. व्यावहारिक मराठी, भाषेचे संवर्धन-विकास या दृष्टीने परिणामकारक प्रयत्न होत नाहीत. एम.फिल.-पीएच.डी. दर्जाच्या संशोधनावर नजर टाकली, तरी त्यामध्ये मराठी भाषेच्या विकासाकरिता उपयुक्त ठरतील, असे शोधप्रबंध होताना दिसत नाहीत. या पार्श्वभूमीवर मराठी भाषा संवर्धन केंद्राची स्थापना वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे.

मराठी संवर्धन केंद्राच्या स्वरूपाविषयी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी माहिती दिली. 'मराठीचा दर्जा घसरत चालल्याबद्दल, दैनंदिन व्यवहारामध्ये मराठीचा वापर करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याबद्दल खंत-नाराजी, टीका केली जाते. परंतु, त्यावर तोडगा शोधण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. एम.ए. मराठी अभ्यासक्रम पूर्ण केल्यास प्राध्यापक-शिक्षक होण्यापलीकडे कोणती संधी उपलब्ध नाही. त्यामुळेच या केंद्राच्या माध्यमातून मराठी भाषाशिक्षणामध्ये आमूलाग्र बदल करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत व्यावहारिक मराठी या विषयीचा स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. प्रसिद्धिमाध्यमे, शासकीय-न्यायालयीन कामकाज आदींमध्ये मराठीचा वापर करण्याचे धोरण आहे. परंतु, त्यासाठी सज्ज मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. त्याचप्रमाणे भाषांतरकलेला वाढते महत्त्व आहे. त्यादृष्टीनेही मराठी भाषेचे दैनंदिन कामकाजाला उपयुक्त ठरणारे शिक्षण देण्याची गरज आहे. प्रादेशिक अस्मिता जपतानाच परप्रांतीयांना मराठी भाषा शिकविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यासाठी पुढाकार घेणे, हे विद्यापीठाचे भाषिक कर्तव्यच आहे,' असेही कुलगुरू म्हणाले.

'मराठी भाषाशिक्षणाच्या दुरवस्थेबाबत केवळ टीका न करता त्याविषयी सकारात्मक मानसिकतेमधून विचारमंथन होण्याची गरज आहे. त्यासाठी काही दिवसांपूर्वी मराठी भाषातज्ज्ञांची बैठक बोलाविण्यात आली होती. त्यामधून करण्यात आलेल्या शिफारशींच्या माध्यमातून भाषा संवर्धन केंद्राची कार्यप्रणाली निश्चित करण्यात येईल,' अशी माहितीही कुलगुरू डॉ. जाधव यांनी दिली. ■

लोकसत्ता
३१/१२/७.

## कुलगुरू कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

पुणे : बेकायदा व क्षमतेपेक्षा अतिरिक्त प्रवेश देणाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी पुणे विद्यापीठात कुलगुरू कार्यालयासमोर भारतीय विद्यार्थी सेनेच्या वतीने बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे पुणे शहर संघटक सुनील जगताप यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत २ महाविद्यालयांमधील बेकायदा व अतिरिक्त प्रवेशासंदर्भात माहिती देण्यात आली होती. मात्र, त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. प्राचार्यांवर व शैक्षणिक पात्रता मान्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करीत नाही तोपर्यंत बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे जगताप यांनी कळविले आहे.

लोकमत

चिंतन इमेज मे...